MHNS230001862020

दाखल दिनांक – ०१.०२.२०२०
नोंदणी दिनांक – ०१.०२.२०२०
निकाल दिनांक – २७.०७.२०२६
कालावधी – ०६व.०५म.२६दि.

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, इगतपुरी, जि. नाशिक येथील न्यायालयात**

**(पिठासन अधिकारीः– श्रीमती ए. सी. रोकडे )**

**नियमित फौजदारी खटला क्र. १७/२०२०**

**निशाणी क्र. २२**

महाराष्ट्र शासन,
तर्फे पोलीस निरीक्षक,
पोलीस ठाणे वाडीव–हे ,
ता. इगतपुरी, जि. नाशिक. **अभियोग कक्ष**

**विरुध्द**

सदाशिव बन्सी आंबापुरे
**वय** – ३८ वर्षे, **व्यवसाय**– शेती,
रा. पहिने, ता.त्रंबक, जि.नाशिक **आरोपी**

---

| | | |
|---|---|---|
| गुन्हयाची तारीख | : | ०३.१२.२०१९ |
| गुन्हा नोंदणीची तारीख | : | ०३.१२.२०१९ |
| दोषारोप पत्र दाखल केल्याची तारीख | : | ०१.०२.२०२० |
| दोषारोपाची तारीख | : | ०९.०३.२०२१ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | : | २८.०१.२०२२ |
| न्यायनिर्णय प्रलंबित ठेवल्याची तारीख | : | २७.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय घोषित केल्याची तारीख | : | २७.०७.२०२६ |

**आरोपीचा तपशील**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | गुन्हयाची कलमे | निर्दोष मुक्त / शिक्षेस पात्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | सदाशिव बन्सी आंबापुरे | ०६.१२.२०१९ | ०६.१२.२०१९ | भा.दं.वि क ३२४, ५०४, ५०६ | निर्दोष मुक्त |

**सरकार तर्फे साक्षीदारांची यादी**

| साक्षीदार क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र.१ (नि.१०) | दिनकर सखाराम गांगुर्डे | साक्षीदार |
| सा.क्र.२ (नि.१४) | चिमाजी रघुनाथ आंबापुरे | पंच |
| सा.क्र.३ (नि.१९) | सागर सावळीराम आंबापुरे | तक्रारदार |

**सरकारी अभियोक्ता** – श्री. ए.जी.मनियार
**आरोपींतर्फे वकील** – श्री. व्ही. बी. कर्नावत

.......................................................................................................................................

## न्या य नि र्ण य
## (घोषित दि. २७ जुलै २०२६)

आरोपीविरुध्द भा.दं.वि कलम ३२४, ५०४, ५०६ प्रमाणे खटला चालविण्यात आला.

०२. **सरकारपक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे –**

दि. ०३/१२/२०१९ रोजी रात्री ९.०० वाजेच्या दरम्यान फिर्यादी हा पहिने, ता. त्रंबकेश्वर येथे गावातील पॉइंटवर गप्पा मारत असतांना आरोपीने त्याच्या पाठीमागून अचानक "माझ्या बायकोसोबत लफडे करतो का" असे बोलून हातातील दगड फिर्यादीच्या डोक्यात मारून शिवीगाळ करून धमकी दिली. त्यानंतर फिर्यादीने पोलीस स्टेशन वाडीव–हे येथे फिर्याद दिली.

०३. सदर फिर्यादीवरुन गुन्हा रजिस्टर क्र.११३/२०१९ भा.दं.वि.कलम ३२४, ५०४, ५०६ प्रमाणे नोंदविण्यात आला. संबंधित तपासी अधिकाऱ्यांनी घटनास्थळ तयार करुन, साक्षीदारांचे जबाब नोंदविले व आरोपीविरुध्द सदरचे दोषोरापपत्र दाखल केले.

०४. माझे पूर्वाधिकारी यांनी आरोपीवर नि.क्र.०७ नुसार भा.दं.वि. कलम ३२४, ५०४, ५०६ प्रमाणे दोषारोप ठेवलेला असुन सदर दोषारोप आरोपीला त्याच्या बोलीभाषेतुन वाचुन दाखविला असता त्याने गुन्हा अमान्य केला. आरोपीविरुध्द दोषारोपपुर्ण असा पुरावा मिळुन न आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता क.३१३(१)(ब) नुसार आरोपीचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

०५. सरकारपक्षाची केस, उभयबाजुंचा युक्तीवाद विचारात घेतल्यानंतर खालील मुद्दे माझे विचाराधीन उपस्थित झाले आहेत. मी त्यांचा निष्कर्ष त्यांच्या समोर खालील दिलेल्या कारणमिमांसेवरुन नोंदविलेला आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सरकारपक्ष हे सिध्द करतो काय की, दि.०३.१२.२०१९ रोजी रात्री ९.०० वा. सुमारास पहिने येथे आरोपीने फिर्यादीच्या डोक्यावर दगडाने मारुन दुखापत करुन भा.दं.वि. कलम ३२४ प्रमाणे अपराध केला ? | **...नकारार्थी...** |

| | | |
|---|---|---|
| २. | सरकारपक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करुन त्याचा उददेशपुर्वक अपमान करुन त्यायोगे त्याला प्रक्षोभित करुन सार्वजनिक शांततेचा भंग करुन भा.दं.वि. कलम ५०४ प्रमाणे अपराध केला ? | **...नकारार्थी...** |
| ३. | सरकारपक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी देवुन भा.दं.वि. कलम ५०६ प्रमाणे अपराध केला? | **...नकारार्थी...** |
| ४. | अंतिम आदेश ? | **...अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>कारणमिमांसा</u>

०६. **<u>मुददे क्रमांक १ ते ४ चे निष्कर्षाबाबतः–</u>** (वरील सर्व मुदयांचे संदर्भात सरकारपक्षाचा पुरावा विचारात घेता चर्चेची पुर्नरावृत्ती टाळण्यासाठी वरील मुद्दे एकत्रीत चर्चिलेले आहेत.) दि.०३.१२.२०१९ रोजी रात्री ९.०० वा.सुमारास पहिने येथे आरोपीने फिर्यादीस दगडाने मारहाण केली. तसेच शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली अशी सरकारपक्षाची केस आहे.

०७. फिर्यादी सा.क्र.३ सागर आंबापुरे याने त्याच्या सरतपासात घटना कधी घडली हे आठवत नाही असे कथन करुन फिर्यादवरील त्यांची सही ओळखली परंतु त्यातील मजकुर त्यांना माहित नसल्याचे सांगितले. सरकार पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान सदर फिर्यादीने त्याला आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार नसुन त्याला केस पुढे चालवायची नाही असे सांगितले आहे. साक्षीदार क्र. १ दिनकर व पंच साक्षीदार क्र. २ चिमाजी यांनी त्यांना घटनेबाबत माहित नसलयाचे कथन केले आहे. सरकार पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान त्यांनी सरकार पक्षास उपयुक्त अशी साक्ष दिलेली नाही.

०८. प्रस्तुत प्रकरणात साक्षीदारांनी आरोपीबाबत गुन्हाच्या अनुषंगाने त्याच्या सरतपासात कथन केले नाही. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार करता सरकारपक्ष हा आरोपीने फिर्यादीस दगडाने मारहाण केली तसेच शिवीगाळ व धमकी दिली या सर्व बाबी शाबीत करण्यास असमर्थ ठरला आहे. सबब, मी मुद्दा क्रमांक १ ते ३ यास नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे व मुद्दा क्रमांक ४ च्या अनुषंगाने खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपी सदाशिव बन्सी आंबापुरे याची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४, ५०६च्या दोषारोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३. मुद्देमाल एम.आर. नं.१५/२०२१ मधील एक दगड मुल्यहिन असल्याकारणाने अपिल कालावधी संपल्यानंतर त्याची योग्य ती विल्हेवाट लावण्यात यावी.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे जामीनपत्र द्यावे.

(**न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित केला.**)

APARNA CHANDRAKANT ROKADE

Digitally signed by APARNA CHANDRAKANT ROKADE
Date: 2026.07.27 15:45:26 +0530

**दिनांकः** २७.०७.२०२६

(ए. सी. रोकडे)

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इगतपुरी. जि. नाशिक.**